ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 4 | DECEMBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# आंबेडकरी चळवळीतील एक कार्यकर्ते - रामराव पवार

डॉ.अनिल मुरलीधर कठारे
प्रोफेसर, विभाग प्रमुख व संचालक , पदव्युत्तर इतिहास विभाग व संशोधन केंद्र, श्री शिवाजी कॉलेज, कंधार , जि. नांदेड

***प्रस्तावना :***



रामराव नामदेव पवार हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आयचे आणि आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते आहेत. त्यांनी आंबेडकरी चळवळीत विविध पातळीवर विविध भुमिकेत कार्य केले. आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे. ते स्वातंत्र्य सैनिक आहेत. त्यांनी हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामातही काम केले आहे. बाबासाहेब डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्या मृत्युनंतर त्यांच्या विचारानुसार त्यांच्या अनुयायांनी चालविलेल्या चळवळीस आंबेडकरी चळवळ म्हणतात.

**पवार घराणे :**

नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात सलगरा ( देशमुख ) हे एक खेडेगाव आहे. कंधार तालुक्यातील बाचोटी येथील महादनाक ( माधवराव ) व सखुबाई वाघमारे यांची एकुलती एक कन्या भागाबाईचा विवाह सलगरा येथील हिरामन पवार या तरुणाशी करण्यात आला होता. परंतु हिरामन अल्पायुषी ठरले. त्यांच्या मृत्युसमयी भागाबाई सात - आठ महिन्याची गरोदर होत्या. त्याचस्थितीत त्या आपल्या माहेरी बाचोटी येथे येऊन कायमच्या राहिल्या. त्यांना नामदेव[१] हे एकच पुत्र जन्माला आले. ते बाचोटी येथेच स्थायिक झाले. अशाप्रकारे सलगरा येथील पवार वंश बाचोटी येथे स्थलांतरीत झाला. नामदेव पवार यांची पत्नी कोंडाबाई होत्या. नामदेवचा मृत्यू २३ ऑगस्ट १९९८ रोजी व कोंडाबाईचा मृत्यू २५ मे २००२ रोजी झाला. नामदेव आणि कोंडाबाई यांना ९ जुलै १९३५ रोजी एक पुत्ररत्न जन्माला आले. तेच रामराव पवार होत. ते मुळ बाचोटी गावचे असले तरी आज त्यांचे वास्तव्य कंधार येथे आहे.

रामराव नामदेवराव पवार यांच्या आजोबांचे नाव हिरामणराव पवार असे होते. ते नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात सलगरा ( खुर्द ) या गावचे रहिवाशी होते. हिरामणराव पवार यांचे लग्न नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यात मौजे बाचोटी येथील सखूबाई भ्र. माधवराव वाघमारे यांची सुकन्या भागाबाई यांच्या बरोबर सलगरा येथे झाले. भागाबाई व हिरामणराव यांचा सुखी संसार चालू असतांनाच साथीच्या ( कॉलरा ) रोगामुळे हिरामणराव यांचा मृत्यू झाला. त्यावेळी भागाबाई सात - आठ महिन्याची गरोदर होती. पतीचे छायाछत्र हरवल्यामुळे भागाबाईचे वडील माधवराव वाघमारे यांनी आपल्या मुलीस बाचोटी येथे घेवून आले व तिच्या पालन पोषणाची संपूर्ण जबाबदारी घेतली. भागाबाई नऊ महिन्यानंतर बाळंतीन झाली आणि तिला मुलगा जन्माला आला. आपल्या मुलीला मुलगा झाल्यामुळे सखुबाई व माधवराव वाघमारे यांना अतिशय आनंद झाला. माधवराव धार्मिक वृत्तीचे होते. त्यामुळे त्यांनी बाळाचे नाव नामदेव ठेवले.

सखुबाई व माधवराव यांना नामदेव शिवाय दुसरे मुल बाळ नसल्यामुळे त्यांनी आपले स्वत:चे घर नामदेव यांच्या नावावर केले. भागाबाई आपल्या नामदेवास मोल - मजुरी करुन वाढवत होती. त्यातच काही वर्षांनी भागाबाईचे आई - वडील मृत्यू पावले. भागाबाईचा पूर्ण आधार गेला होता. त्यामुळे भागाबाईला आपल्या मुलाचे नामदेवाचे लग्न करावे असे वाटू लागले. त्यामुळे त्यांनी आपल्या शेजाऱ्यांशी व नातेवाईकांशी हितगुज करुन नामदेव पवार यांचे लग्न नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यात कोलंबी येथील शाहूबाई भ्र. पिलाजी लांडगे यांची एकुलती एक मुलगी कोंडाबाई हिच्या बरोबर झाले.

मौजे बाचोटी येथील मानेजी वाघमारे, देवबा वाघमारे, काळबा वाघमारे, हिरामण वाघमारे, संताजी वाघमारे, ईरबाजी वाघमारे, महिपती वाघमारे, शेकोजी वाघमारे इत्यादी प्रमुख मंडळीमध्ये सहकार्याची भावना होती. त्यांनी भागाबाईंना सहकार्य केले. त्यांना भावनिक आधार दिला. नामदेवराव पवार व कोंडाबाई यांच्या संसाराला भागाबाईने सतत मोलाची साथ दिलेली होती. खंडू काळबा वाघमारे, पोचाजी ईरबा वाघमारे, जयवंत ईरबा वाघमारे, बुऱ्हान साहेब इत्यादीचे नामदेवरावांना सहकार्य लाभले. नामदेवराव पवारांनी त्यांच्या सहकार्याकडे बाचोटी, गोळेगाव, भूकमारी, हाळदा, कोलंबी इत्यादी ठिकाणी शिंदीचा व्यवसाय ( मक्ता ) केला. तसेच ते जनावरांची हेडी म्हणजे खरेदी - विक्री करुन आपला उदरनिर्वाह करीत असत.

रामराव नामदेवराव पवार यांची वंशावळ

**हिरामण पवार ( मौ. सलगरा ता. मुखेड जि. नांदेड )**

**कोंडाबाई भ्र. नामदेवराव पवार ( बाचोटी ता. कंधार जि. नांदेड )**

रामराव शंकर शेषेराव केवळाबाई अनुसया नारायण आनंदा प्रतिभा कोंडाबाई व नामदेवराव यांना एकूण ९ ( नऊ ) आपत्ये झाली. त्यापैकी पहिली मुलगी, सहाव्या क्रमांकाची मुलगी अनुसाया व सातव्या क्रमांकाचा मुलगा नारायण या तीन अपत्यांचा आकस्मिक मृत्यू झाला. बाकीची सहा अपत्ये जगली. रामराव नामदेवराव पवार हे दुसऱ्या क्रमांकाचे अपत्ये आहेत. त्यांना जन्माला आलेल्या पहिल्याच मुलीचा मृत्यू झाला होता.

## शिक्षण :

नामदेव हिरामण पवार यांना रामराव, शंकर, केवळ, शेषेराव, नारायण, अनुसया, आनंदा व प्रतिभा अशी आठ मुलं - मुली होती. रामराव यांचे मुळ नाव राम होते. त्यांचे शिक्षण एस.एस.सी.[२]आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बाचोटी येथे इयत्ता चौथी पर्यंतचे तर जिल्हा परिषद हायस्कुल कंधार येथे इयत्ता अकरावी पर्यंतचे शिक्षण झाले. इ.स. १९५६ मध्ये ते मॅट्रीक परिक्षा अनुत्तीर्ण झाले आणि डिसेंबर १९७६ मध्ये मॅट्रीक परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांनी २९ जुलै १९५७ रोजी जि. प. हायस्कुल कंधार येथेच इयत्ता अकरावीत प्रवेश घेतला. परंतु सतत अनुपस्थित असल्याने ३० सप्टेंबर १९७७ रोजी त्यांचे नाव शाळेतुन कमी करण्यात आले. बाचोटी ते कंधारचे अंतर दहा कि. मी. आहे. माध्यमिक शिक्षण घेताना रामराव पवार यांना बाचोटी ते कंधार पायी चालत यावे लागत होते.

## ग्रामसेवक :

त्याकाळात मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण झाले तरी सरकारी नोकरी मिळत असे. इ.स. १९५८ मध्ये नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथे कृषी सुधार केंद्रात रामराव पवार यांना नोकरी मिळाली. कृषी सुधार केंद्र ही खाजगी संस्था होती. इ.स. १९६०-६१ मध्ये ग्रामसेवक[३] या पदावर त्यांची नेमणूक झाली. ग्रामसेवक असतानाच त्यांच्याकडे तलाठी पदाचाही अधिभार होता. इ.स. १९६० पासून इ.स. १९७२ पर्यंत कंधार तालुक्यातील बोळका आणि परिसरातील सहा गावाचा ग्रामसेवक पदाचा कार्यभार त्यांनी सांभाळला. नोकरी करीत असताना त्यांना अस्पृश्य समाजाचे कष्टमय जीवन जवळून पाहता आले.

## विवाह :

इ.स. १९६० - ६१ मध्ये ग्रामसेवक या पदावर नोकरी मिळाली. परंतु रामराव पवार यांनी लवकर विवाह केला नाही. डिसेंबर १९६४ मध्ये त्यांचा विवाह लक्ष्मीबाई यांच्याशी झाला. त्या गणपतराव भिवाजी कांबळे राहणार मंगलसांगवी कांबळे हे नई आबादी नांदेड येथे रहात होते. त्यामुळे त्यांनी आपल्या मुलीचे लग्न नांदेड येथेच करुन दिले. त्याकाळात हुंडा प्रथा नव्हती. मुलीच्या वडिलानाच धान्याच्या स्वरुपात हुंडा देण्याची प्रथा त्या काळात होती. रामराव पवार यांचा परिवारही मोठा आहे. त्यांना सविता, सुरेखा, संगिता, सुजाता, सुनंदा, बाळा व सुगत अशी सात अपत्ये आहेत.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी :

बाळु हरदास एल.एन. यांनी १४ एप्रिल १९३३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हयातीत महाराष्ट्रात नागपूर येथे त्यांची जयंती[४] प्रथमच साजरी केली. जयंतीच्या निमित्ताने संत्रा मार्केट नागपूर येथे सभा संपन्न झाली होती. १२ एप्रिल ते १८ एप्रिल

१९३७ रोजीही बाबु हरदास एल.एन. यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ४५ वा जन्मदिन नागपूर येथे साजरा केला होता. ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मृत्यू झाला. त्यानंतर नांदेड जिल्ह्यात कंधार तालुक्यात काटकळंबा[५] येथे १४ एप्रिल १९५७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पहिली जयंती मंगाजी पुरभाजी चावरे, चंदर चावरे व यमाजी चावरे यांनी साजरी केली. मंगाजी चावरे यांनी बाबासाहेबांची प्रतिमा एका खुर्चीत ठेऊन खुर्ची डोक्यावर घेऊन प्रतिमेची मिरवणूक गावात काढली. गावातील मंदिरात सवर्ण लोक भजन- किर्तन करीत होते. त्यांना बाबासाहेबांच्या प्रतिमेची मिरवणूक गावात आल्याचे समजले. त्यामुळे त्यांनी ही मिरवणूक अडविण्याचे ठरविले. सवर्ण लोकांचा मिरवणूक अडविण्याचा निश्चय एका सवर्ण वृध्द स्त्रीने मंगाजी चावरे यांना सांगितला. एवढेच नाही तर त्या स्त्रीने सवर्ण लोक मिरवणूकीवर काठी - कुऱ्हाडीने हल्ला करणार असल्याचेही सांगितले. त्यामुळे मिरवणूकीतील अस्पृश्य मंडळी सावध झाली. ठरल्याप्रमाणे सवर्ण लोकांनी गावात मिरवणूक अडविली. वातावरण तंग झाले. ही बातमी उस्माननगर पोलिस ठाण्यास समजली. पोलिसांनी येऊन पंचनामा केला. २८ सवर्ण लोकांवर गुन्हे[६] नोंदविले. आणि त्यांना पोलिसांनी अटक केली. त्यावेळी डॉ. केशवराव धोंडगे कंधार विधानसभेचे आमदार होते. त्यांनी बऱ्याच दिवसानंतर समाजाची बाजू घेतली व तडजोड केली. शेवटी जयंती उत्सव साजरा करण्यात आला. या उत्सवात रामराव पवार, जळबाजी पोटफोटे ( नांदेड ), रि.पा.ई.चे बी.सी. कांबळे गटाचे नांदेडचे नेते कडकनाथ हटकर व नामदेव गायकवाड यांनी सहभाग घेतला होता.

### आंबेडकरी चळवळीचे नेतृत्व :

ग्रामसेवक आणि तलाठी म्हणून सरकारी नोकरी करीत असताना रामराव पवार यांना अस्पृश्य आणि स्पृश्य लोकांचे जीवन जवळून पाहता आले. अस्पृश्य समाज अत्यंत वाईट स्थितीत जीवन जगत होता. त्यांना अस्पश्य समाजाच्या दयेवर व मर्जीनुसार जीवन जगावे लागत असे. त्यांना अस्पृश्य म्हणून हीन दर्जाची वागणूक दिली जात असे. जागोजागी त्यांना अपमानास्पद वागणूक दिली जात असे. सार्वजनिक मंदिरे, शाळा व पाणवठे याठिकाणी त्यांना प्रवेश नव्हता. स्पृश्य आणि अस्पृश्य समाजाच्या सामाजिक स्थितीत फार फरक होता. रामराव पवार हेही स्वत: अस्पृश्य असलेल्या महार जातीत जन्माला आले होते. त्यामुळे त्यांना स्पृश्य समाजाकडून होणाऱ्या अन्यायास तोंड द्यावे लागले होते. अस्पृश्य समाजाच्या स्थितीत परिवर्तन घडवून आणण्यासाठी चळवळ आवश्यक होती. त्यामुळे रामराव पवार यांनी एप्रिल १९७२ मध्ये ग्रामसेवक पदाच्या नोकरीचा राजीनामा दिला व त्यांनी आंबेडकरी चळवळीत सहभाग घेऊन चळवळीचे नेतृत्व[७] केले.

### सामाजिक कार्य :

रामराव पवार यांनी जनसेवा हेच ध्येय उराशी बाळगुन इ.स. १९७२ मध्ये सरकारी नोकरीचा राजीनामा दिला व सामाजिक कार्यात व आंबेडकरी चळवळीत स्वत:ला झोकून दिले. त्यांनी गणपतराव मोरे[८] यांच्या प्रेरणेने इ.स. १९७२ मध्येच भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला व राजकारणाच्या माध्यमातून अस्पृश्य समाजाच्या कल्याणासाठी सामाजिक कार्य सुरु केले. त्यांनी कंधार तालुका कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष म्हणून कार्य केले. ते इ.स. १९७३-७४ मध्ये कंधार नगर परिषदेत स्विकृत सदस्य म्हणून गेले. आंबेडकर चळवळीचा नेता व कार्यकर्ता म्हणून त्यांनी गरीब लोकांना अन्न-धान्य पुरविले. महात्मा गांधी स्वच्छता अभियानाच्या माध्यमातू हरिजन सप्ताहद्वारे त्यांनी जनतेला ग्राम स्वच्छता व अस्पृश्यांच्या वस्तीतील स्वच्छतेचे महत्त्व सांगितले. सार्वजनिक पाणवठे, विहिर आणि मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश दिला जात नव्हता. अशावेळी त्यांनी सामाजिक एकता व बंधुभाव[९] वाढीस लावण्याचे कार्य केले.

### हुंडा पध्दतीस विरोध :

रामराव पवार हे फुले - शाहू - आंबेडकरांच्या विचारानुसार वागणारे आहेत. त्यांनी स्त्री - पुरुष समतेवर भर देऊन हुंडा पध्दतीस विरोध केला. हुंडा पध्दती ही समाजाला लागलेली फार मोठी किड आहे. त्यामुळे अनेक मुलींची लग्न अडखळली आहेत. रामराव पवार यांनी आपल्या मुला-मुलींचे विवाह सत्यशोधक पध्दतीनुसार साध्या पध्दतीने केले आहेत. हुंडा दिला नाही आणि घेतलाही नाही. मात्र त्यांनी आपल्या मुलींचे विवाह आपल्या घरी करुन दिले. त्यांच्या मुला-मुलींची नावे आणि विवाह दिनांक खालीलप्रमाणे आहेत.

१) सविता रमेश वाघमारे, शिरुर ता. कंधार, जि. नांदेड, २५ मे १९८६.
२) सुरेखा एकनाथ धन्वे, किनी ता. देगलूर जि. नांदेड, ११ जुन १९८८.

३) संगिता भगवान बामणे, सिंदगी ता. जळकोट जि. लातूर, ६ जुलै २००१.
४) सुजाता वसंत सोंडारे, बाऊलगाव ता. मुखेड जि. नांदेड, १७ जुलै २००६.
५) सुनंदा प्रविण ढवळे, हिप्परगा कुरुळा ता. कंधार जि. नांदेड, ३० मे २००९.
६) बाळा रामराव पवार तक्षसिला भंडारे यांचा विवाह, हडको नांदेड, २५ नोव्हेंबर २००७.
७) सुगत रामराव पवार वैशाली गडेराव यांचा विवाह, विक्रमनगर लातूर, २५ डिसेंबर २०११.

**समाज सुधारणा :**

रामराव पवार यांनी समाज सुधारणा संबंधात विविध प्रकारचे कार्य केले. त्यांनी समाजातील अनिष्ठ प्रथा दूर करण्यासाठी प्रयत्न केले. महार व मांग जातीत मरीआई व लक्ष्मीआई या देवतांना मुलगा पोतराज म्हणून आणि खंडोबास मुरळी म्हणून मुलगी सोडण्याची परंपरा होती. पोतराज व मुरळी हे या देवतांचे दास आणि दासी म्हणून ओळखले जात. मरिआई ही महारांची लक्ष्मीआई ही मांगाची देवता आणि खंडोबा ही बहुजनसमाजाची देवता आहे. पोतराज स्वत:चा विवाह करीत असे परंतु मुरळी मात्र अविवाहीतच रहात असे. एकंदरीत पोतराज व मुरळीचे जीवन चांगले नसे. ते त्यांच्या देवतांच्या नावाने भिक्षा मागून उपजिवीका करीत असत. पोतराज व मुरळी म्हणून आपले मुल देवतांना वाहण्याची प्रथा बंद करण्यासाठी रामराव पवार यांनी प्रयत्न केले. त्यांच्यासोबत नांदेड येथील कडकनाथ हटकर व काटकळंबा येथील मंगाजी पुरभाजी चावरे होते. त्यांनी पोतराजाचे केस कापण्याचे कार्य केले. रामराव पवार यांचे वडिल नामदेव पवार हेही पोतराज होते. त्यांचेही केस कापण्यात आले. महार लोकांची आर्थिक स्थिती चांगली नसल्यामुळे ते मृत जनावरांचे मांस खाऊन उपजिवीका करीत असत. परंतु मृत जनावरांचे मांस खाणे आरोग्यास घातक होते. त्यामुळे रामराव पवार यांनी गावोगाव जाऊन याबाबतीत जनजागृती केली. त्यांनी लोकांना मृत जनावरांचे मांस खाऊ नये म्हणून मृत जनावरांच्या मांसावर रॉकेल टाकले. लोकांनी मृत जनावरांचे मांस खाऊ नये ही या पाठीमागची भुमिका होती.

**शैक्षणिक कार्य :**

इ.स. १९६० च्या दशकात अस्पृश्य समाजाला शिक्षणापेक्षा उदरनिर्वाह कसा करावयाचा हा प्रश्न महत्त्वाचा वाटत होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तर शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा हा संदेश दिला होता. बाबासाहेबांच्या मृत्युनंतर त्यांच्या अनुयायांनी अस्पृश्य समाजात शिक्षणाचा प्रसार करुन त्याचे महत्त्व त्यांना पटवून सांगितले. परंतु एवढ्यावरच भागणारे नसल्यामुळे त्यांनी शैक्षणिक संस्था काढून वसतिगृह सुरु करणे आवश्यक होते. बाबासाहेबांनी मुंबई येथे ८ जुलै १९४५ रोजी पीपल्स एज्युकेशन[१०] सोसायटी स्थापन केली व १९ जून १९५० रोजी औरंगाबाद येथे पी.ई.एस. महाविद्यालय व वसतिगृह सुरु केले. अगदी याचप्रमाणे रामराव पवार यांनी प्रथम गावोगावी जाऊन अस्पृश्य समाजाला शिक्षणाचं महत्त्व पटवुन सांगितले. परंतु गाव, वाडी, तांड्यावरील मुलांना शिक्षणाची व्यवस्था नव्हती. आजच्या सारखे रस्तेही नव्हते. त्यामुळे शिक्षणासाठी संस्था व वसतिगृह आवश्यक होते. यासाठी रामराव पवार यांनी इ.स. १९६७ मध्ये बाचोटी येथे तक्षसिला शिक्षण संस्था[११] स्थापन केली. याच संस्थेने इ.स. १९६७ मध्ये बाचोटी येथेच डॉ. बाबसाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह सुरु केले. या वसतिगृहास इ.स. १९६९ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण विभागाने मान्यता दिली. पुढे हे वसतिगृह १९८० मध्ये कंधार येथील सिध्दार्थनगर वसाहतीत स्थलांतरीत करण्यात आले. या वसतिगृहात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना आले. या वसतिगृहात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. या वसतिगृहातमुळे मागास वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी निर्माण झाली.

**साप्ताहिक रणसंग्राम :**

वृत्तपत्रे ही चळवळीचा प्रसार करण्याची प्रमुख माध्यमे असतात. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुकनायक, जनता बहिष्कृत भारत, समता, प्रबुध्द भारत ही वृत्तपत्रे सुरु केली. वृत्तपत्रातून चळवळीचे विचार प्रसारीत करता येतात. समाज प्रबोधन सुध्दा करता येते. तसेच अन्याय - अत्याचारासही वाचा फोडता येते. याच हेतुने रामराव पवार यांनी इ.स. १९६९ मध्ये कंधार येथे प्रज्ञा - करुणा प्रिंटिंग प्रेस सुरु केली. तर मे १९७२ मध्ये साप्ताहिक रणसंग्राम[१२] हे वृत्तपत्र सुरु केले. या वृत्तपत्राच्या माध्यमातून रामराव पवार यांनी अस्पृश्यांवरील अन्याय - अत्याचाराला वाचा फोडली. त्यामुळे अस्पृश्यांना न्याय मिळू लागला. जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी रामराव पवार यांनी या वृत्तपत्राच्या माध्यमातून कार्य केले. परंतु पुढे त्यांना हे वृत्तपत्र चालविणे अवघड झाले. त्यामुळे त्यांनी हे वृत्तपत्र भा.ग. देशपांडे यांना चालविण्यासाठी दिले.

## चळवळीतील सहकारी :

रामराव पवार यांनी आंबेडकरी चळवळीत जवळपास ६६ वर्षे काम केले. नेता आणि कार्यकर्ता अशा दोन्ही भुमिका त्यांनी पार पाडल्या. त्यांनी कंधार तालुक्यातील आंबेडकरी चळवळीचे नेतृत्व केले तर राज्यपातळीवर त्यांनी कार्यकर्ता म्हणून कार्य केले. या चळवळीत त्यांना अनेक सहकारी मिळाले. हनमंतराव मोरे, गणपतराव वाघमारे, माधवराव नेरलीकर, हिरामनराव संभाजी गायकवाड, किसनराव सूर्य, दुर्गादास कदम, केशवराव कदम, पंचनामाकार गायकवाड, मकाजी कांबळे, मरिबा कांबळे, काळबाजी गायकवाड, संतराम कांबळे, पोचीराम वाघमारे, बाबाराव कांबळे, जयवंतराव वाघमारे[१३] हे त्यांचे चळवळीतील सहकारी कार्यकर्ते आहेत. अरविंदराव नळगे, माधवराव पांडागळे, शिवाजीराव बोधगिरे, संभाजी पाटील गिरे, संभाजीराव केंद्रे, ईश्वरराव भोसीकर, बाबासाहेब पाटील लुंगारे, शिवराम पवार, दिगंबरराव पेठकर, देविदासराव मोरे, गणपतराव मोरे, देवराव सोनखळे हे त्यांचे राजकारणातील सहकारी आहेत.

## नामांतर चळवळ :

औरंगाबाद येथे २३ ऑगस्ट १९५८ रोजी मराठवाडा विद्यापीठ स्थापन करण्यात आले. या विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याची मागणी २६ जून १९७४ रोजी मराठवाडा रिपब्लिकन विद्यार्थी संघटनेने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव फुलसिंग नाईक यांना पत्र पाठवून केली होती. मच्छिंद्र वाहूळ[१४] हे या संघाचे अध्यक्ष होते. पुढे हीच मागणी दलित पँथरचे सरचिटणीस गंगाधर गाडे यांनी ७ जुलै १९७७ रोजी केली. परंतु या मागणीस प्रखर विरोध करण्यात आला. त्यामुळे या मागणी संदर्भात नामांतरवादी व नामांतर विरोधक असे दोन गट निर्माण झाले. नामांतरासाठी दलित पँथर या संघटनेने आंदोलन सुरु केले. २७ जुलै १९७८ रोजी महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नाव देण्याचा ठराव पास झाला. परंतु मराठवाड्यात जातीय दंगली उसळल्या. ग्रामीण भागात दलित वसाहतीवर हल्ले करुन दलितांवर अन्याय अत्याचार करण्यात आले. परिस्थिती चिघळली गेल्यामुळे सरकारने ठरावाची अंमलबजावणी केली नाही. यावेळी शरदचंद्र पवार हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. नामांतराच्या मागणीसाठी दलित पँथरचे आंदोलन पुढे चालूच राहिले. शेवटी महाराष्ट्र सरकारला नामांतराचा विचार करणे भाग पडले. शेवटी १४ जानेवारी १९९४ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार यांनी नामांतर ऐवजी नामविस्ताराची घोषणा केली व मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नाव देण्यात आले. विद्यापीठ नामांतर चळवळीत रामराव पवार यांचे योगदान महत्त्वाचे ठरले. नामांतरावरुन झालेल्या जातीय दंगलीत दलित समाज होरपळून निघाला. या दंगलीची चौकशी करावी आणि दलितांना न्याय मिळावा अशी मागणी रामराव पवार यांनी महाराष्ट्र सरकारकडे केली होती. मराठवाड्यात झालेल्या नामांतर दंगलीची चौकशी करण्यासाठी लोकसभेची एक सर्वपक्षीय खासदार समिती नेमण्यात आली. या समितीचे अध्यक्ष खासदार कांबळे बी.सी. होते. या समितीने मराठवाड्याचा दौरा करुन दंगलग्रस्त भागाची पाहणी केली व आपला अहवाल शासनास सादर केला. समितीने नांदेड जिल्ह्यासही भेट दिली. नांदेड येथे यशवंत सभागृहात समितीची बैठक संपन्न झ ाली. या बैठकीस नांदेड जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीतील नेते व कार्यकर्ते आले आणि त्यांनी समितीस आपला अहवाल सादर केला. रामराव पवार हेही या बैठकीस आले होते. त्यांनी कंधार तालुक्याचा अहवाल समितीला सादर केला होता. विद्यापीठ नामांतर होण्याच्या दृष्टीने रामराव पवार यांनी अस्पृश्य समाजात प्रबोधन घडूवन आणून त्यांना चळवळ करण्यासाठी प्रवृत्त केले.

## दलित पँथरची सभा :

मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीचे नेतृत्व दलित पँथर[१५] या संघटनेने केले. या संघटनेची स्थापना ९ जुलै १९७२ मध्ये झाली. राजा ढाले हे या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष होते. नामांतर चळवळीच्या काळात दलित पँथरच्या नेत्यांनी मराठवाड्यात ठिकठिकाणी सभा घेऊन नामांतर चळवळीस गतिमान करण्याचा प्रयत्न केला होता. कंधार येथील दलित पँथरच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी कंधार येथे राजा ढाले यांची सभा आयोजित केली होती. दलित पँथर या संघटनेत इ.स. १९७७ मध्ये फूट पडल्यानंतर राजा ढाले यांची सभा कंधार येथे इ.स. १९७८ मध्ये झाली होती. यावेळी सर्व तरुण मुले दलित पँथरमध्ये होती. कंधार तालुक्यातील नामांतर चळवळ हा संशोधनाचा स्वतंत्र विषय होऊ शकतो. बाबुराव कांबळे, आनंदा पवार, बापूराव गायकवाड, निवृत्ती ढवळे व

जळबाजी पोटफोडे[१६] यासारखे अनेक तरुण नामांतर चळवळीत अग्रभागी होते. नामांतर प्रश्नावरुन इ.स. १९७८ मध्ये मराठवाड्यात जातीय दंगली झाल्या. त्यावेळी रामराव पवार यांनी वातावरण शांत करण्याचा प्रयत्न केला.

**पुरस्कार :**

रामराव पवार यांनी सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात केलेल्या कार्याचा सन्मान आणि गौरव विभिन्न सामाजिक संघटनांनी त्यांना पुरस्कार देऊन केला आहे.

**१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार :**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने रामराव पवार यांना त्यांनी केलेल्या समाजसेवेबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार (२००७-०८ ) माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते मुंबई येथे प्रदान करण्यात आला.

**२) अशोक धम्मसेवक पुरस्कार :**

अशोक सर्वांगीण विकास सोसायटी पुणे या संस्थेने रामराव पवार यांना बुध्द विहार चेतना चक्रभुमी चक्किपाट आग्रा येथे अशोक शिलवंत यांच्या हस्ते अशोक धम्मसेवक पुरस्कार १८ मार्च २०१२ रोजी प्रदान करण्यात आला. अशोक शिलवंत हे अशोक सर्वांगीण विकास सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आग्रा येथे इ.स. १९५३ मध्ये बुध्द मुर्ती स्थापन केली होती.

**३) भिमरत्न पुरस्कार :**

बुध्दविहार कृतिसमिती देहु रोड जि. पुणे या समितीने रामराव पवार यांना २५ डिसेंबर २०१२ रोजी भीमरत्न पुरस्कार दिला. या समितीचे संस्थापक अध्यक्ष भीमपुत्र टेक्सास गायकवाड आणि संस्थापक भीमशाहीर हरिष गंगाधर चौरे आहेत. देहू रोड येथेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इ.स. १९५४ मध्ये बुध्द मूर्ती स्थापन केली होती.

**४) भगवान बुध्द नॅशनल फेलोशिप अवार्ड :**

दिल्ली येथील भारतीय दलित साहित्य अकादमीने रामराव पवार यांना १२ डिसेंबर २०१३ रोजी २८ व्या राष्ट्रीय दलित लेखक परिषदेत अकादमीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. एस.पी. सुमनाक्षर यांच्या हस्ते भगवान बुध्द नॅशनल फेलोशिप अवार्ड - २०१३, प्रदान करण्यात आला.

**५) कंधार तालुका रत्न पुरस्कार :**

महात्मा कबीर समता परिषद नांदेड तर्फे रामराव पवार यांना सन २०१२-१३ या वर्षाचा कंधार तालुका रत्न पुरस्कार २५ डिसेंबर रोजी २०१३ रोजी बाबासाहेब पाटील लुंगारे सांस्कृतिक सभागृह कंधार येथे माधवराव पाटील झरीकर यांच्या हस्ते देण्यात आला.

**निष्कर्ष :**

१. रामराव पवार हे सरकारी नोकरी करीत होते. परंतु जनसेवा हे ध्येय उराशी बाळगून त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला व ते आंबेडकरी चळवळीत आले.
२. नांदेड जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पहिली जयंती १४ एप्रिल १९५७ रोजी कंधार तालुक्यात काटकळंबा येथे साजरी करण्यात आली. या जयंती उत्सवाचे नेतृत्व मंगाजी पुरभाजी चावरे यांनी केले. या उत्सवात रामराव पवार यांच्यासहीत अनेकांचा सहभाग महत्त्वाचा ठरला.
३. कंधार तालुक्यातील आंबेडकरी चळवळीचे नेतृत्व रामराव पवार यांनी केले. नेता व कार्यकर्ता म्हणून त्यांनी केलेले कार्य महत्त्वाचे ठरते.
४. रामराव पवार यांनी अस्पृश्य समाजाचे प्रबोधन घडवून आणले. त्यासाठी गावोगावी दौरे केले.

५. रामराव पवार यांनी हुंडा पध्दतीस विरोध केला. त्यांनी आपल्या मुला- मुलींचे विवाह हुंडा न घेता व न देता केले.
६. मागासवर्गातील विद्यार्थ्यांच्या निवास व भोजनाची सोय होण्यासाठी रामराव पवार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह सुरु केले.
७. समाज प्रबोधन करण्यासाठी व अन्यायाला वाचा फोडण्यासाठी रामराव पवार यांनी साप्ताहिक रणसंग्राम हे वृत्तपत्र सुरु केले.
८. विद्यापीठ नामांतर चळवळीत रामराव पवार यांनी महत्त्वाचे योगदान दिले.

**संदर्भ सूची :**


१. पवार रामराव नामदेव, कंधार यांची प्रत्यक्ष मुलाखत, दि. ३० ऑक्टोबर २०१६.
२. कित्ता.
३. कित्ता.
४. संघर्षसूत सिध्दार्थ, लोकप्रिय बाबू हरदास एल.एन., समता सैनिक दल, नागपूर, २०१३, पृ.८८.९२.
५. चावरे डोमाजी, काटकळंबा यांची प्रत्यक्ष मुलाखत, २८ ऑक्टोबर २०१६.
६. पवार रामराव नामदेव, पूर्वोक्त.
७. पवार रामराव नामदेव, जीवन कार्याचा अल्प परिचय, पृ.३.
८. कित्ता, पृ.४.
९. कित्ता., पृ. ३.
१०. झेलिएट एलीनॉर, डॉ. आंबेडकरांचे नेतृत्व व दलितांचा शिक्षणातील पुढाकार, सुगावा प्रकाशन, पुणे, १९८६, पृ.२०
११. पवार रामराव नामदेव, पूर्वोक्त.
१२. कित्ता.
१३. गायकवाड हिरामन संभाजी, कंधार यांची प्रत्यक्ष मुलाखत, दि. २७ ऑक्टोबर २०१६.
१४. गव्हाणे सुधीर, नामांतर लढा एक शोधयात्रा, परिवर्तन पब्लिकेशन मुंबई, १९९६, पृ.२०.
१५. लिंबाळे शरणकुमार ( संपादक ), दलित पँथर, सुगावा प्रकाशन, पुणे, १९८९, पृ.१.
१६. पवार रामराव नामदेव, पूर्वोक्त.